नि.फौ.के. नं. ११६/२०२५
महाराष्ट्र शासन वि. विजय
निशाण क्र. १२

(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपी हा इतर गुन्हयांत कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह येथे असल्याने त्यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे सदर आरोपीस हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.
सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा जबाब शपथेवर सुरु.

**नाव** – मकरंद विश्वनाथ पांचाळ,
**वय** – ४२ वर्षे, **व्यवसाय** – चालक,
**राहणार** – करंबेळे तर्फे संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –

**०१**. दिनांक ३०/१०/२०२५ रोजी मी माझ्या घरी हजर होतो. त्यादिवशी पोलीस अधिकारी – सचिन कामेरकर यांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत मनिष महाडीक हे देखील हजर होते. संजयकुमार महाडीक यांच्या घरी चोरी झाली होती. त्याठिकाणाचा पंचनामा करावयाचा होता. त्यावेळी आमच्या सोबत तीन पथक – श्वान पथक, ठसे घेणारे पथक व तिसरे पथक (मला आता नाव आठवत नाही) असे हजर होते. पोलीस देखील घटनास्थळी हजर होते.

०२. पंचनामा करण्यासाठी आम्ही संजयकुमार महाडीक यांच्या घरी गेलो. तेथे चोरी झाली होती. कपडे अस्ताव्यस्त टाकलेले होते. किचनमध्ये जेवण करुन ठेवलेली भांडी होती. फिर्यादीने तेथे सदरचे घटनास्थळ आम्हाला दाखविले. घराची कौले काढुन आतमध्ये प्रवेश केल्याचे आम्हाला तेथे दिसुन आले. अंगणामध्ये एक खाट होती, त्यावर कढई, एक टोप, ताट, मेणबत्त्या, पाण्याचे ग्लास असे होते. तेथे एक सिमकार्ड व आधारकार्ड पडलेले होते. अंगणाच्या कठडयावर एक जीन्स पँट होती. पोलीसांनी पंचनामा करुन ते ताब्यात घेतले. ते दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(साक्षीदाराला **वस्तु – 'अ' ,'ब' व 'क' कडील मुद्देमाल** दाखविण्यात आला). ते तेच आधार कार्ड, जीओ कंपनीचे सिमकार्ड व जीन्स पँट असून त्यावर लावलेल्या लेबलवर माझी सही आहे.* सदरचा मुद्देमाल फिर्यादीच्या घरीच सिलबंद करुन ताब्यात घेण्यात आला होता. तेथे मिळुन आलेली एक टोप व एक चमचा/पळी इत्यादी मुद्देमाल ठसे घेणारे पथक घेवुन गेले.

०३. पोलीसांनी तेथे नकाशा काढला व आमच्या सहया घेतल्या.

*(त्यानंतर सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखवितो, असे तोंडी म्हणणे सादर केले. त्यावर आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी आक्षेप घेतला की, सदर साक्षीदाराने त्यांचेसमक्ष पंचनामा केल्याचे कथन केले नाही. सरकारी अभियोक्ता हे सदर साक्षीदारास सुचक प्रश्न विचारात आहेत. त्यावर सहा. सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, पंचनामा करण्याकरीता बोलाविल्याचे साक्षीदाराच्या सरतपासात दुसऱ्या ओळीत आलेले आहे.*

*दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकता, घटनास्थळ पंचनामा यास निशाणी क्रमांक पडलेला असुन तो पुराव्यात वाचता येईल. निशाणी क्रमांक पडलेला दस्त साक्षीदाराला दाखविण्यास कोणताही कायदेशीर अडथळा*

*नाही. बचावपक्षास सदर साक्षीदाराचा उलटतपास घेवुन सरतपासातील कथने खोडुन काढण्याची पुर्ण संधी मिळणार आहे. सबब, घटनास्थळ पंचनामा दाखविण्यास परवानगी देण्यात येते).*

**०४.** *(साक्षीदारास निशाणी क्रमांक ११ कडील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (साक्षीदारास घटनास्थळ नकाशा दाखविण्यात आला). तो नकाशा घटनास्थळी रेखाटण्यात आला असुन त्यावर अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणुन माझी सही आहे. सदरचा नकाशा तेथील परीस्थीतीप्रमाणे रेखाटण्यात आला आहे. (सदर* ***घटनास्थळ नकाशास निशाणी क्रमांक १३*** *देण्यात येते).* पोलीसांनी तेथे छायाचित्रे घेतली होती.

**सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंती वरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.03 18:17:11 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०३/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 03/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 03/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 03/02/2026 |